पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ७२ /२०२३ दि. २८/०४/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत परमपुज्य स्वामी डी. के. दास महाराज क्रिडांगण, डायघर गाव येथे हिंदु जनजागरण धर्म सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर सभेसाठी किमान १५,००० ते २५,००० जन समुदाय उपस्थित राहणार आहे. सभेपुर्वी दुपारी १५:४५ वा. चे दरम्यान श्री दत्त मंदिर कल्याण फाटा येथून सभेच्या ठिकाणापर्यत बाईक रॅली काढण्यात येणार आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात जन समुदाय एकत्र येणार असून कार्यक्रम संपल्यानंतर जन समुदाय त्यांचे वाहनासह मुंब्रा शहरातून ठाणे व नाशिकच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत. मुंब्रा शहरात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने शिळफाटा जंक्शन येथून मुंब्रा शहराकडे येणारे सर्व प्रकारच्या वाहनांना पुर्णपणे प्रवेश बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**ज्याअर्थी,** कल्याण, डोंबिवली, दिवा, पनवेल, महापे कडून येणारी हलकी चार चाकी वाहने, कार, मोटर सायकल यांना शिळफाटा येथे प्रवेश बंद करण्यात येत असल्याने नमूद मार्गावरून जाणारी व येणारी वाहतूक बाधीत होणार आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण, डोंबिवली, दिवा, पनवेल, महापे कडून येणारी हलकी चार चाकी वाहने, कार, मोटर सायकल यांना शिळफाटा येथून मुंब्रा शहराचे दिशेने जाण्यास पूर्णपणे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर हलकी चार चाकी वाहने कार, मोटर सायकल यांना शिळफाटा येथून डावे वळण घेवून महापे सर्कल येथून वळण घेवून हॉटेल पोर्टीका सरोवर समोरून उजवे वळण घेवून रबाळे एम.आय.डी.सी. मार्गे रबाळे नाका–ऐरोली पटणी कळवा मार्गे छत्रपती शिवाजी चौक कळवा मार्गे मार्गस्थ होतील.

सदरची अधिसुचना दि. ३०/०४/२०२३ रोजी १५:०० वा. पासून हिंदु जनजागरण धर्म सभा संपेपर्यत लागू राहील.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. वाहतूक उपविभाग ठाणे.